**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - २०/०५/२०२३

## दि.१९/०५/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ६३०/२०२३ भा.द.वी.कलम ३०७,३२४, ५०४,५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१९/०५/२०२३ रोजी १०/३० वा च्या सुमारास सुसगावा मधील काळुबाई मंदिराच्या शेजारी अबीला टॉवरमध्ये ता.मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०५/२०२३ रोजी २०.३६ वा. |
| फिर्यादी | :- | इक्रम अब्दुलजब्बार मजुन्दार वय २३ वर्षे रा.सध्या सुस गाव मयुर नांदखेडे यांच्या घरी भाडयाने ता.मुळशी जि.पुणे मुळ गाव कोपलीपार थाना लंका जि.हुजाई आसाम मोबाईल नंबर ९५१८७८२८५२/९३८७७९८२२८ |
| आरोपी | :- | हणुमंत महादेव बेंबळेकर ऊर्फ ( बाबु ) रा. विठठल नगर बालाजी कॉलणी, वारजे, पुणे. **आरोपी अटक नाहि** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे नातेवाईक नामे साकीर हुसेन मुजुमदार, सायदुल रफिकुल इस्लाम, अफजल अब्दुल जब्बार मुजुमदार असे सुसगावामधील काळुबाई मंदिराच्या शेजारी अबीला टॉवरमध्ये वॉटर प्रुफ्रींगचे काम करण्यासाठी गेले असता तेथे त्यांना वॉटर प्रुफ्रींगच्या कामासाठी पाण्याची आवश्यक्ता असल्याने त्यांनी १७ व्या मजल्यावर पाण्यासाठी पाईप लावलेली होती. पाईप मधुन पाणी येणे बंद झाल्याने अफजल अब्दुल जब्बार मुजुमदार हा पहाण्यासाठी गेला तेथे टाईल्सचे काम करणारे आरोपी याने तुम्हांला दिवसभर पाणी मिळणार नाही असे म्हणुन अफजल याच्या कानाखाली मारले व अफजल याला का मारले याचा जाब विचारण्यासाठी फिर्यादी व साकीर हुसेन मुजुमदार ,सायदुल रफिकुल इस्लाम, अफजल अब्दुल जब्बार मुजुमदार असे विचारण्यासाठी गेलो असता टाईल्सचे काम करणारा आरोपी याने त्याच्या हातातील फावडयाने फिर्यादी यांना मारुन साकीर हुसेन मुजुमदार याला जिवे ठार मारण्याच्या उददेशाने त्याच्या डोक्यात मारले व तो खाली पडला आरोपी म्हणाला तुझे मारही डालेगा मादरचोद असे म्हणुन त्याने शाकीरच्या डोक्यामध्ये अजुन दोन वेळा जोराने मारहाण करुन गंभीर जखमी केले तसेच फिर्यादी यांना डाव्या हातावर सायदुल रफिकुल इस्लाम, याला कमरेवर फावडयाने मारहाण केली व अफजल अब्दुल जब्बार मुजुमदार यांना हाताने कानाखाली मारली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खडके ७७४१९९६३४३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ४६७/२०२३ भा.दं.वि.सं.क.४५२,५०४,५०६,१४३,१४७,१४९ सह अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे कलम ६, सुधारीत २०१५ चे कलम ३(१) (आर),३(१) (एस),३(१) (व्हीए) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/०५/२०२३ रोजी रात्रौ १०.३० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी, मेदनकरवाडी, ता.खेड, जि. पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १९/०५/२०२३ रोजी २१/२६ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय ४० वर्षे |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | :- | १) महिला आरोपी ,<br>२)इतर ०२ अनोळखी महिला व ०२ अनोळखी पुरूष<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे घरचे सर्वजण घरी असताना अचानक आरोपी क्र १ व इतर ०२ अनोळखी महिला व ०२ अनोळखी पुरूष फिर्यादीचे घरात येवून जातीवाचक शिवीगाळ करून, घोडा घेवून ये यांना मारून टाकु असे फोनद्वारे कोणासतरी सांगुन आरडाओरड केला म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोआ प्रेरणा कट्टे चाकण विभाग ९४२३४८८५९७ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव १३९/२०२३ भादवि ३७६(२)एन,बा.लै.अ.सं.अधि२०१२ क.३ (अ),४,५(एल),६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | फेब्रुवारी २०२३ महीन्यामध्ये (नक्की तारीख आठवत नाही) ते मार्च २०२३ महीन्याचे शेवटच्या आठवडया पर्यंत मु.पो. बेबडओव्हळ गट नंबर १९६ ता.मावळ जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०५/२०२३ रोजी ०२/०५ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | राजू हरीभाऊ जाधव रा. शिळेश्वर, ता. मुळशी, जि. पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मुलगी वय १३ वर्षे ११ महीने सध्या रा. सदर ही कुसगाव, ता. मावळ, जि. पुणे हि गावचे हद्दीतील मांढगुळकर यांचे शेजारील शेतातील चिंचा पाडणेसाठी गेली असताना तेथे काम करीत असलेल्या ठिकाणी आरोपी याने फिर्यादी यांच्या मुलीस ‘‘मला तु खुप आवडते, माझे तुझेवर खुप प्रेम आहे, आपण दोघे पळून जावून लग्न करू’’ असे म्हणून तिचे संमती शिवाय जबरदस्तीने तिचेसोबत शरीर संबंध ठेवून वारंवार बलात्कार केला आहे व तु जर हे कोणाला सांगीतले तर मी तुला व तुझे घरच्यांना मारून टाकेन अशी धमकी दिली. फिर्यादी त्यांच्या कुंटूबासह घडलेल्या घटनेबाबत विचारणा करणेसाठी आरोपीकडे गेले असता फिर्यादी यांचा मुलगा नितिन यास आरोपीने हाताने मारहाण करून शिवीगाळ दमदाटी केली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि येडे शिरगाव पोस्टे मो नं.९७६३७२७५२२ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ३३५/२०२३ भादविक ३२५,५०४, ५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि१८.०५.२०२३ रोजी २०.०० सारथी सोसायटी, महात्मा फुलेनगर, चिंचवड, पुणे येथील सोसायटीचे आवारामध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९.०५.२०२३ रोजी १२/५८ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी |
| आरोपी | :- | अमित चिकोडकर, रा.फ़्लॅट नंबर ३,बिल्डींग नंबर १०३,सारथी सोसायटी,महात्मा फुलेनगर,चिंचवड,पुणे<br>**आरोपी अटक नाहि** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व आरोपी हे एकाच सोसायटीमध्ये राहत आहेत. फिर्यादी यांनी सोसायटीचे पाठीमागे असलेल्या तारेचे कम्पाऊडला लावलेली तार बाजुला काढली होती. यावरुन आरोपी याने फिर्यादी व फिर्यादी यांचे पतीला शिवीगाळी देवुन,मारण्याची धमकी दिली व फिर्यादी यांचे उजवे हाताचे पंजा पकडुन पिरगळल्यामुळे उजवे हाताची करंगळी वाकडी होवुन फॅक्चर करुन दुखापत केली म्हणुन. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कुदळे ७०५८३२२३२३ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ६२९/२०२३ भादवि कलम ४०६,४२० भादवि सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६,(क),६६(ड) अन्वये |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/०५/२०२३ रोजीचे १३/०० वा ते १३/४० वा च्या दरम्यान .महाळुंगे प्लॅटनंबर ७०४ - ४ ई व्हिंग कुल इकोलोच सोसायटी डीलाईट नांदे महाळुंगे रोड तालुका मुळशी जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०५/२०२३ रोजी १७.३९ वा. |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी |
| आरोपी | :- | फोन नंबर ७३७२८९६४७४ वरील अनोळखी इसम पुर्ण् नाव पत्ता माहित नाही |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे रहाते घरी असताना फोन नंबर ७३७२८९६४७४ वरील अनोळखी इसमाने फिर्यादी यांना त्यांची पर्सनल माहीती विचारुन त्याने फिर्यादीचे नावावर ऑनलाईन पर्सनल प्री अप्रुअल लोन हे २,००,०००/- रुपये फिर्यादीचे खात्यावर घेवुन फिर्यादीचे खात्यातुन ३,४०,६३९ रुपये इतके रुपये डेबीट झाल्याचा फिर्यादी यांचे मोबाईलवर मेसेज आला .त्यानंतर **१,७०,३१९** रुपये, **१,३७,५४१** रुपये **१०,०००/-** रुपये **१०,०००/-** रुपये ५,०००/- रुपये असे एकुण ६,७३,४९९/- रुपये फिर्यादीचे खात्यामधुन काढुन घेतले. हे सर्व रुपयांपैकी ६,४८,४९९/- रूपये हे फिर्यादी यांचे खात्यामधुन एअर पे या पेमेंट गेटवे मार्फतीने झाल्याचा फिर्यादी यांचे मोबाईलवर मेसेज आलेला आहे. व इतर २५,०००/- रुपये हे पे यु व टेक्नो प्रोसेस मार्फतीने डेबीट करुन फोन नंबर ७३७२८९६४७४ वापरणा-या इसमाने फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खडके ७७४१९९६३४३ |

०६

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ६३१/२०२३ भा.दं.वि. कलम-३२३,४०६,३५४ड,५०९,५०७, सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६७,(अ),प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८/०१/२०२३ रोजी ते दि.१८/०५/२०२३ रोजी पावेतो |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०५/२०२३ रोजी २३.४१ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | आफताब युनिस अन्सारी वय २४ वर्षे रा.२३८ दुसरा मजला मनकामना मस्जीत सनलाईट कॉलनी नवि दिल्ली **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे ओळखीचा मुलगा आरोपी याने फिर्यादी यांना वेळोवेळी नगदी पैसे मागुन तसेच त्यांच्या वेगवेगळया मित्रांच्या करवी ऑनलाईन असे एकुण २,४०,०००/ रुपये पैसे मागुन घेतले व फिर्यादींनी त्यास परत मागीतले असता त्याने फिर्यादीस हाताने मारहाण केली व वेगवेगळया मोबाईल फोनवरुन फोन करुन धमकी दिली तसेच त्याने फिर्यादी यांचा फोटो इडीट करुन त्यावर त्यांचा मोबाईल नंबर लिहुन त्या फोटोवर कॉल मी असे लिहुन इंस्टाग्राम ॲपवर त्याची आय डी **_AFTAB_ANSIARI_001** वरुन फिर्यादी यांना त्यांच्या इंस्टाग्राम आयडी **MISS_MANVI17** यावर पाठवुन मी तुझा फोटो वायरल करेन आणी तुझे खुप फोटो माझ्याकडे आहेत.मी असेच इडीट करुन वायरल करेन तसेच फिर्यादीचे इंस्टाग्राम अकांऊट हॅक झाले आहे. अशी खोटी कम्पेंट पोलीस स्टेशन येथे देईन असे म्हणुन धमकी दिली.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खडके ७७४१९९६३४३ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २२९/२०२३ भा.द.वि.कलम३७०(३),३४ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/०५/२०२३ रोजी सायं १७/०० वा. सुमा. JASMINE FAMILY SPA मधील लाकडी प्लायवुडमध्ये बनवलेल्या रुम नं २ मध्ये, पहिला मजला, सर्वे नंबर ७१/१/२/६० मेन रोड, कृष्णा नगर, नवी सांगवी पुणे |

गुन्हा दाखल :- दि.१९/०५/२०२३ रोजी ०५.०९ वा.

फिर्यादी :- मारुती महादेव करचुंडे वय ३७ वर्षे पोना १५३६ नेमणूक- अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्ष पिंपरी चिंचवड

आरोपी :- १)कुणाल राममुर्ती रेड्डी वय ३९ वर्षे रा. १९ /३ नाईक चाळ, विटभट्टी जवळ, बोपोडी पुणे
मो.नं.७०६६०९५९३ (स्पा चालक)
२) महिला आरोपी (स्पा मालक)
**आरोपी क्र १ व २ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी संगणमत करून स्पा सेंटरचे नावाखाली दोन पिडीत महिलांना पैशांचे अमिष दाखवून त्यांना स्पा मसाज सेंटरचे नावाखाली वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि गुन्हे तांबे ९८२३०७९८५२

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ४३६ /२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब) (आय)(ब), २९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१९/०५/२०२३ रोजी १३.२५ वा. चे सुमा. लांडगेनगर, भोसरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१९/०५/२०२३ रोजी १८ /२१ वा.

फिर्यादी :- धोंडीराम बालाजी केंद्रे वय ३५ वर्षे पोलीसनाईक २२८९ नेमणुक भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- १) महिला आरोपी वय ४० वर्षे २) अमर निवृत्ती जेधे वय २८ वर्षे रा. लांडगेनगर, भोसरी पुणे
**आरोपी क्र २ अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील महिला आरोपी १ व आरोपी क्र २यांनी त्यांचे कब्जात एकुण १,८६,०२५/- रु. किं. चा माल, त्यामध्ये ५०,०२५ रु. किं.चा एकुण २ किलो ००१ ग्रॅम वजनाचा गांजा, ३६,००० रु. रोख रक्कम व १,००,०००/- रु. किं.चा ॲपल मोबाईल यांचेसह गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिर रित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आले.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि भवारी ९६२३८८२००८

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी २३०/२०२३, भा.दं.वि.कलम ४०६,४२०, ३४ सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०८/०५/२०२३ रोजी व दिनांक ०९/०५/२०२३ रोजी, घर नंबर ३७, कुनाल आयकॉन हौसींग सोसायटी, कुनाल आयकॉन रोड, पिंपळे सौदागर, पुणे

गुन्हा दाखल :- दि.१९/०५/२०२३ रोजी, २१/१४ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १)निखील जोशी, वय ३२ वर्षे, पत्ता ग्रीन वीच, लंडन, इग्लंड, मो.नंबर अ४४७४१८३६०६३०
२)व त्याची एक महीला साथीदार, तिचे नांव, पत्ता माहीत नाही.
**आरोपी अटक नाहि**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी यांनी जीवनसाथी डॉट कॉम या वेबसाईटवरुन फिर्यादी यांना फोन व व्हॉट्सअप कॉल करुन आणि लग्नाचे आमीष दाखऊन तुला सोने, आयफोन व परदेशी चलन इंग्लंडहुन बॅगमध्ये पार्सल पाठवुन देतो असे सांगुन त्याकरीता कस्टम ड्युटी, परदेशी चलन कन्वर्ट व भारतीय कर भरण्यास एकुण रक्कम रुपये ०७,९७,७००/- रुपये ऑनलाईन पध्दतीने घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि (गुन्हे) तांबे ९८२३०७९८५२

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २३१/२०२३, भा.दं.वि.कलम ४०६,४२० सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/०५/२०२३ रोजी ११/५५ वाजताचे दरम्यान, पत्ता फ्लॅट नंबर १०१, ए विंग, प्लॅनेट मिलेनियम हौसींग सोसायटी, कुजीर कॉलनी, कुनाल आयकॉन रोड, पिंपळे सौदागर, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०५/२०२३ रोजी, २१/३० वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी |
| आरोपी | :- | मेशो ॲपवरील अनोळखी इसम, त्याचे पुर्ण नांव, पत्ता माहीती नाही. |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी या त्यांच्या मेशो ॲपवरील त्यांची पाठीमागील रक्कम परत घेण्यासाठी त्यांच्या कस्टमर केअरला फोन केला असता, त्यांनी फिर्यादी यांचा फोन वरीष्ठ कार्यालयाकडे वळविल्यानंतर तेथील अनोळखी इसमाने, त्याचा नांव, पत्ता माहीती नाही त्याने फिर्यादी यांना एक रस्कडेस्क नावाचा रिफंड सर्व्हिस ॲप डाऊनलोड करण्यास सांगुन व त्यातील रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करण्यास लावुन फिर्यादी यांची एकुण रक्कम रुपये ०१,५०,०००/- .किंमतीची ची आणि मोबीक्वीक ॲपमधुन रक्कम रुपये ०७,०००/- ची ऑनलाईन पध्दतीने अर्थीक फसवणुक केली |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि (गुन्हे) तांबे ९८२३०७९८५२ |